ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.V/Nov 2011pp.1-4

Research Paper

# कविता म्हणजे काय ?

प्रा. रविकिरण शेटे
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय उस्मानाबाद.

## प्रस्तावना

कविता हा अतिशय तरल असा वाङ्.मय प्रकार आहे. गद्याची शेकडो पाने लिहून जे कांही कल्पना, विचार आपल्याला सांगावयाचे आहे ते सांगु शकत नाही ते कवितेच्या चार ओळीत आपल्याला सांगता येते. जीवन परिपूर्ण व्हावे, जीवनाला अर्थ लाभावा, भावनांना साद मिळावी यासाठीच कवितेचा जन्म झाला आहे. तीचा आस्वाद घ्यायला हवा. कवितेतलं आम्हाला कांही कळत नाही म्हणून आम्ही तिच्या वाटयालाही जात नाही असे म्हणणऱ्या शिक्षक, विद्यार्थी, वाचकांची संख्या कांही कमी नाही त्यांच्यासाठीच.....

मराठी साहित्य परंपरा ही अतिशय उत्कृष्ठ आहे. कविता हे तीचं रम्य, भव्य, लावण्यमय, देखण, साजिरं गोजीरं रुप आहे. मराठी साहित्यांनं ग्रंथाच्या प्रांगणात पाऊल टाकल ते कवितेच पैंजण बांधुनच. मानवी अंतःकरणातील शाश्वत व अमर धर्माच्या उद्यानात फुललेल काव्यपुष्प म्हणजे कविता किंवा पद्य होय. ही कविता नंदनवनातील फुलाप्रमाणे सदैव गंधाने दरवळलेले प्रफुल्लीत मुद्रेणे रसिकांचे अंतरंग खुलविणारे प्रियदर्शनच आहे. कविता म्हणजेच स्व ची जाणीवपुर्वक होणारी अभिव्यक्ती. सर्वसामान्य व्यवहारात अत्यंत सामर्थ्य शाली असते. काय सांगितले आहे त्या इतकेच काय सांगितलेले नाही हे ही कवितेत तितकेच महत्वाचे असते.1

'कविचा अनुभव म्हणजे कविता'. 'जी भावपुर्ण शब्दात व्यक्त होते ती कविता'. 'जी विविध संवेदनातून व्यक्त होते तीला कविता म्हंटले जाते'. कविता हा आपल्या सांस्कृतीक जीवनाला व्यापून टाकणारा प्रकार आहे. कविता हा एक मुलभूत वाङ्.मय प्रकार आहे. आपल्या सास्कृतीक जीवनाला व्यापून टाकणारा कविते इतका प्राचिन वाङ्.मय प्रकार नाही. म्हणून कवितेचा जन्मच मुळी भाषेबरोबर झाला आहे.2

कथा, कादंबरी, नाटक, ललित लेखन या सर्व वाङ्.मय प्रकाराहून भिन्न असा हा कविता वाङ्.मय प्रकार आहे. कविता हा सगळयात सुक्ष्म वाङ्.मय प्रकार आहे, निखळ वाङ्.मय प्रकार आहे. कवितेची शब्दकळा इतर प्रकारांपेक्षा वेगळी असते. कमीत कमी शब्दात प्रथमतः मानवाने गीत म्हटले त्यात संगीताचा साज असे त्यातूनच ती कविता भावानुभवाकडे झुकत गेली व तेथुनच कवितेचा जन्म झाला. प्राचीन वाङ्.मयात काव्य हाच सर्वात प्रतिष्ठित वाङ्.मय प्रकार होता.

कविता हाच खरा माणसाच्या जगण्याचा गाभा आहे. सुखदुःखाची साथ करते ती कविता, आयुष्यात सोबत करते ती कविता मग ते अंगाई गीत असो, लग्न मंडपातल्या मंगलअष्टका असोत किंवा आणखी कांही. आपण कवितेत आणि कविता आपल्यात एकमेंकांची सम्मती न घेताच नकळत मिसळून गेलो आहोत. अंतरिक वेदणेने गालावरून ओघळणारे आश्रू म्हणजेच कविता. प्रियजनांच्या दर्शनाने मनात उमटणाऱ्या आनंद लहरी म्हणजेच कविता. शश्वत मुल्य लाभलेली कविता ही आपोआपच लोकांच्या मनात जाऊन रूतून बसते मग ती केशवसुतांची तुतारी असो, गोविदाग्रजांची मुरली असो, सावरकरांची सागरा प्राण तळमळला असो, कुसुमाग्रजांचे कोलंबसाचे गर्वगीत असो की, वेगात दौडले मर्द मराठे सात असो, या आणि अशा असंख्य कविता महाराष्ट्र जीवन समृध्द करून गेल्या, अजरामर झाल्या. पोवाडे, लावणी, भारूड, अभंग, विराणी म्हणजे मनुष्य जीवनाला कंगोरे देवून ते परिपूर्ण करणाऱ्या भावछटांना स्वरलहरी आणि संगीत लहरी प्राप्त झाल्या तर स्वर्गीय सुख देणारे गीत निर्माण होते. 'आपल्याच मस्तीत कालक्रमणा करणारा आणि भावभावनांना जराही दाद न देणारा निसर्ग ही क्षणभर स्तब्ध करण्याची किमया गीतात आहे.3

मराठी कविता ही शब्दसौष्ठव, वृत्त, कला वगैरे अनेक दृष्टीनी संपन्न होत चालली आहे. तिला ध्येयवाद पटला आहे. तिची दृष्टी सौंदर्यस्पर्शी झाली आहे. तिच्यात सखोलता व व्यापकता दोन्हीही आता येवू लागली आहे.4

आद्यकवी मुकूंदराजच्या विवेकसिंधू पासून मराठी काव्याचा प्रवाह सुरू होऊन तो आज पर्यंत अखंडपणे वाहतो आहे. ओवी, अभंग, गौळणी, भारूडे, पोवाडे, लावणी, विराणी, नाटयगीते, भावकविता, मुक्तछंद, गझल अशी विविधता या काव्याला आजवर लाभली आहे. आजवर शेकडो वर्षे झाले तरी जनामनसावरील तिचा प्रभाव अद्यापही जसाच्या तसाच आहे. स्पर्श, रंग, रुप, रस, गंध, नाद या संवेदना व्यक्त करणारे शब्द सामर्थ्य कवितेत असतात. काव्य हे केव चार क्षण करमणूक व्हावी लिहले जात नाही, फावल्या वेळेत गुणगुणण्यास असावे म्हणून काव्य रचली जात नाहीत त्यापेक्षा अधिक थोर व भव्य कामगीरी काव्य करीत असते. जीवनातील जी जी सौंदर्य स्थळे नजरेला ओळखता येत नाहीत व ज्या ज्या बाबीचे महत्व जानता येत नाही, त्या सौंदर्य स्थळांची व बाबीची थोरवी पटवुन देण्याचे कार्य काव्य करीत असते. रसग्राहक वृत्तीचा उत्कर्ष कवीच्या अंगी आलेला असतो म्हणूनच केशवसुत म्हणतात ''कविता म्हणजे आकाशाची वीज आहे ती धरू पहाणारे शेकडा नव्यान्नव आपणास होरपळून मात्र घेतात मी अशा नव्यान्नवां पैकीच आहे''.5

जीवनात आढळणाऱ्या सौंदर्याचे रसपान तो करतोच पण त्याच बारोबर वाचकांनांही त्या सौंदर्याचा लाभ घडावा अशी व्यवस्था तो करतो. सामान्य माणूस डोळे असूनही आंधळया सारखा, कान असून ही बहिऱ्या सारखा हिंडत फिरतो. भोवताली ज्या ठिकाणी सौंदर्य साठलेले आहे, त्याचे आस्तित्वही त्याला जानवत नाही. असल्या आळशी मनोवृत्तीला काव्य हे डिवचून जागे करते व भोवतालचे सौंदर्य निरखीण्यासाठी प्रवृत्त करते. काव्य ही भावनांची भाषा म्हणून जो पर्यंत समजली जाते तो पर्यंत त्याला मरण नाही. कारण काव्य म्हणजे जीवनावर घतलेला सोनेरी अलंकार नसुन ते प्रत्यक्ष जीवन लतीकेवर फुललेले पुष्पच आहे.

***संदर्भ*** :–

1. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमन, (संपादक) 'भाषांतर मिमांसा' पृ.

क्र.129.
2. फ.म.शहाजिंदे, (संपादक) 'मराठवाडयातील कविता', निर्मल प्रकाशन नांदेड, प्रथम आवृत्ती,1998,पृ.क्र.16.
3. 'आकंठ' दिवाळी 95, कविता विशेषांक पृ.क्र. 12.
4. वसंत बापट 'शतकाच्या सुवर्णमुद्रा', साधना प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती,2002, पृ.क्र.69.
5. डॉ. अक्षयकुमार काळे, 'अर्वाचीन मराठी काव्य दर्शन', पा.ना. बनहट्टी प्रकाशन नागपुर, प्रथम आवृत्ती,1999 पृ.क्र 19.